# कविता

## आकांक्षा

आकांक्षा माझ्या बहरूनी गेल्या, देश प्रीतीचा सोडूनी आलो
मला न कळले ओढ कशाची, पाऊले ह्या पंढरीची वाट चाललो

कुणी न होते सगे सोयरे जरी, परी नवे बंध हे जुळुनी आले
परत फिरायची वाट ती मोकळी, पण मन येथे कसे गुंतुनी गेले

मोहमयी हे जीवन सारे अवती-भवती, खुणवत राही दूरदूरूनी
वात्सल्याचा झरा निर्मळ तो धरणांमागूनी का खुणावे अजूनी

वैभव, कीर्ती, यशासाठी जरी सोन्याचा तो पिंजरा सोडला
पैशावाचून अडते सारे, मंत्र जुना हा पुनःपुन्हा आळवला

का खरेच तुटती नाती आपुली, कुणी न माझे अन् मी कोणाचा
गाथा तुकोबाची का कुणा ना कळली, विश्वबंधुता कल्पनाच उरली

**अमित भावे** ( लॉस अँजलिस, कॅलिफोर्निया)